॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, ड्रॅगन, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १९३ वा | शुक्रवार, दि. ०६ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन बिकणे आहे.
9763764949

कृषी विषयक
मिरची, सिमला मिरची, पपई, वांगी, कलिंगड, खरबूज, काकडी पिकांवरील थ्रिप्स, पांढरी माशी, कोळी, व्हायरस, चुरडा-मुरडा नियंत्रणासाठी, जलद वाढ, फुटव्यासाठी, पिकांची रोगप्रतिकारक, किड प्रतिबंधक शक्ती, उष्णतेचा ताण सहन करण्याची क्षमता वाढवण्यासाठी एकमात्र अनुभवसिध्द औषधी 'प्रतिकार', 'प्रहार', 'प्रतिबंध' महाराष्ट्रात कोठेही पाठवले जाईल.
संपर्क :
कुदरत ॲग्रो ऑरगॅनिक्स
9970115450


# ‘लाडक्या बहिणीं'ची सुरक्षा धोक्यात

## एकाच वर्षात हरवलेल्या महिलांची संख्या 2613, तर मुलींची संख्या 797 ने वाढली

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** एकीकडे महिला सुरक्षा आणि महिला सक्षमीकरणाच्या बढाया मारणाऱ्या भाजप-शिंदे सरकारच्या काळात महिला आणि मुली असुरक्षित असल्याची चिंताजनक स्थिती सरकारनेच दिलेल्या आकडेवारीतून समोर आली आहे.

राज्यात 2024 मध्ये 45 हजार 662 महिला हरवल्या होत्या, तर 2025 या एकाच वर्षात तब्बल 48 हजार 278 महिला हरवल्या आहेत. तर 2024 मध्ये 11 हजार 316 मुली हरवल्या होत्या, तर 2025 मध्ये 12 हजार 113 मुली हरवल्या आहेत. म्हणजेच 2024 च्या तुलनेत महिला 2613 तर 797 मुली गतवर्षीच्या तुलनेत जास्त हरवल्या आहेत. याबाबत खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच विधान परिषदेत माहिती दिली.

राज्यात बेपत्ता होणाऱ्या अल्पवयीन मुले, मुली आणि महिलांबाबत भाजपचे आमदार निरंजन डावखरे यांनी विधान परिषदेत मुद्दा उपस्थित केला. हरवलेल्या महिला, मुली शोधण्यासाठी सरकार कोणत्या उपाययोजना करीत आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. यावर मुख्यमंत्र्यांनी सरकार महिला,





मुलींच्या सुरक्षेसाठी 'ऑपरेशन मुस्कान', 'ऑपरेशन शोध', पोलिसांची गस्त वाढवणे, पोलीस काका, पोलीस दीदी, सर्व पोलीस पोलीस ठाण्यांत महिला मदत कक्ष आणि शाळांमध्ये मुलींवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी 'सेफ्टी ऑडिट' करण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

**सरकार म्हणते...**

'ऑपरेशन मुस्कान'अंतर्गत आतापर्यंत एकूण 41 हजार 193 लहान मुले आणि मुलींना शोधण्यात पोलिसांना यश आले आहे. बेपत्ता महिलांपैकी 55 ते 60 टक्के महिला पहिल्या वर्षभरात सापडतात, तर अडीच ते तीन वर्षांत हे प्रमाण जवळपास 90 टक्केपर्यंत पोहोचते. सध्या महिलांचा शोध घेण्याच्या प्रमाणात 10 टक्क्यांनी वाढ झाली आहे, परंतु वर्षभरानंतर मुलींचे कुटुंबीय किंवा वयस्कर व्यक्तींच्या बाबतीत घरचे लोक आणि पोलीस पाठपुरावा करणे सोडून देतात, ही चिंतेची बाब असल्याचे फडणवीस म्हणाले.

**आता शोध कामगिरीवर पोलीस ठाण्यांचे रँकिंग ठरवणार**

महिला, मुलींच्या शोधमोहिमेला गती देण्यासाठी आता महिलांच्या शोधमोहिमेवर पोलीस आणि पोलीस ठाण्यांचे रँकिंग ठरवण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. बेपत्ता मुली, महिलांचा शोध घेण्यासाठी विशेष पथक नेमण्यात आल्याचेही ते म्हणाले.

**अशी आहे आकडेवारी**

2024 मध्ये 45 हजार 662 महिला तर 11 हजार 316 अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या होत्या. तर 2025मध्ये 48 हजार 278 महिला तर 12 हजार 113 मुली बेपत्ता झाल्या. हरवलेल्या महिलांचा पोलिसांच्या माध्यमातून शोध घेतला असता 2024 मध्ये 30,877 महिला तर 8475 मुली सापडलया. तर 2025 मध्ये 36,581 तर 10,295 मुली सापडल्या आहेत.

# ‘माझा शिवबा’ लेखन स्पर्धेतून नव्या पिढीत शिवचरित्राचे संस्कार रुजविण्याचा प्रयत्न

## संस्कारक्षम वयातच छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, मूल्ये व आदर्शाचे सॉफ्टवेअर टाकणे - डॉ.शेटे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा आणि नव्या पिढीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे संस्कार रुजावेत, या उद्देशाने चंद्रनील सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘माझा शिवबा’ या भव्य लेखन स्पर्धेच्या माध्यमातून लहान वयातच विद्यार्थ्यांच्या मनात शिवचरित्राचे सॉफ्टवेअर टाकण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करण्यात आले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ शिवव्याख्याते शिवरत्न शेटे यांनी केले.

चंद्रनील सोशल फाउंडेशनतर्फे आयोजित ‘माझा शिवबा’ लेखन स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. सी. ए. सुशील बंदपट्टे यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. नव्या पिढीने छत्रपती शिवाजी महाराजांना केवळ डोक्यावर घेण्यापेक्षा त्यांच्या विचारांना डोक्यात घ्यावे, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना शेटे म्हणाले की, आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात संगणकामध्ये जसे सॉफ्टवेअर टाकले जाते तसेच ते काम करते. त्याचप्रमाणे समाजात चांगली व विचारशील पिढी घडवायची असेल, तर संस्कारक्षम वयातच मुलांच्या मनात छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, मूल्ये आणि आदर्श यांचे सॉफ्टवेअर टाकणे अत्यंत आवश्यक आहे. ‘माझा शिवबा’ लेखन स्पर्धेमुळे कुटुंबातील प्रत्येक सदस्याला शिवचरित्र विविध अंगांनी समजण्याची संधी मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले. मराठा हा केवळ जातीवाचक शब्द नसून समूहवाचक शब्द असल्याचे उदाहरण देत त्यांनी समाजातील एकात्मतेवर भर दिला. तसेच आजच्या स्त्रियांनी मोबाईलच्या आहारी न जाता जिजाऊंसारखे संस्कार घडविण्याचे कार्य करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सी. ए. सुशील बंदपट्टे यांनी चंद्रनील सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून समाजप्रबोधनात्मक उपक्रम राबविले जात असल्याची माहिती





दिली. ‘एकच ध्यास... समाजाचा विकास!’ या ब्रीदवाक्याखाली ही लेखन स्पर्धा प्रत्येक कुटुंबापर्यंत आणि कुटुंबातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. शिवजयंती उत्सव केवळ नाचून नव्हे तर वाचून साजरा करावा, असा संदेश त्यांनी यावेळी दिला.

या प्रसंगी पोलीस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, मूल्ये आणि आदर्श नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी ही लेखन स्पर्धा निश्चितच प्रेरणादायी ठरली आहे.

स्पर्धकांना मार्गदर्शन करताना सहरा इन्स्टिट्यूटचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. जंवजाळ यांनी सांगितले की, ‘माझा शिवबा’ लेखन स्पर्धेचे आयोजन हे समाजप्रबोधनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असून या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचन आणि लेखनाची आवड वाढीस लागेल. यावेळी त्यांनी आरोग्य विषयावरही मार्गदर्शन केले.

संभाजी आरमाराचे संस्थापक श्रीकांत डांगे यांनी आपल्या भाषणात सोलापूर हे डीजे मुक्त शिवजयंती साजरी करणारे एकमेव शहर असल्याचे अभिमानाने सांगितले.

या लेखन स्पर्धेसाठी तीन गट करण्यात आले होते. त्यामध्ये पहिला गट - इयत्ता पाचवी, सहावी व सातवी, दुसरा गट - इयत्ता आठवी, नववी व दहावी, तर खुला गट - दहावीपुढील सर्व वयोगटांसाठी खुला ठेवण्यात आला होता.

स्पर्धेसाठी ‘शिवाजी महाराजांचे बालपण’, ‘स्त्री सन्मान व शिवराय’ आणि ‘शिवाजी महाराज आता असते तर...’ असे तीन विषय देण्यात आले होते. गटनिहाय शब्दमर्यादाही निश्चित करण्यात आली होती. पहिल्या गटासाठी ३०० ते ४०० शब्द, दुसऱ्या गटासाठी ४०० ते ६०० शब्द, तर खुल्या गटासाठी ७०० ते १००० शब्दांची मयार्दा ठेवण्यात आली होती. या स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि आकर्षक रोख बक्षिसे देण्यात आली. पहिल्या व दुसऱ्या गटातील प्रथम १० क्रमांकांना प्रत्येकी ₹२५००, द्वितीय २० क्रमांकांना ₹१५०० आणि तृतीय ३० क्रमांकांना ₹१००० असे रोख बक्षीस देण्यात आले. खुल्या गटातील प्रथम क्रमांकाला ₹११,०००, द्वितीय क्रमांकाला ₹७,००० आणि तृतीय क्रमांकाला ₹५,००० अशी बक्षिसे देण्यात आली.

यावेळी विचारपीठावर स्थायी समितीचे सदस्य शिवाजी वाघमोडे, ॲड. अंबरीष खोले, पांडुरंग सुरवसे, विकास गोसावी, भोमीशा शहा यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चंद्रनील सोशल फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

**पाचवी ते सातवी (गट -१) प्रथम आलेले स्पर्धक.**

1.मनस्वी पाटील
2.आर्य आशिष मोरे
3.क्षितिज तुकाराम जाधव
4.गार्गी कामठणकर
5.सार्थक शिवाजी शिंदे

**आठवी ते दहावी (गट-२) प्रथम आलेले स्पर्धक**

1.रुमाना फिरोज शिकलगार
2.सुरभी अतुल साळुंके
3.गायत्री दीपक मोरे
4.दिव्या बळीराम गावडे
5.नाभा नरसिंग वैचाल

**खुल्या गटातून विजयी झालेले स्पर्धक**

1. मल्लिका विजय पाटील
2. सिमा बिज्जरागी
3. सरफराज हुसेन शेख

**पाचवी ते सातवी (गट -१) विजयी झालेले स्पर्धक**

1.मनस्वी पाटील
1.आर्य आशिष मोरे
1.क्षितिज तुकाराम जाधव
1.गार्गी कामठणकर
1.सार्थक शिवाजी शिंदे
2.आरुषी संतोष कोळी
2.अनावी रेवण सिद्धप्पा
2.चैत्राली अण्णासाहेब पानसे
2.अनुष्का रतिकांत माने
2.शांभवी जयंत शेळके
२.कल्याणी श्रीनिवास करडस
2.आरोही रवी शेवाळे
2.नीरजा किशोर मंतूरकर
२.उपासना सतीश भालेकर
2.संस्कृती संतोष पिंपळे
3.आयुष महेश कासेलकर
3.अथर्व निवारुत्ती माने
3.विभव जय राजपूत
3.शोलक राहुल धर्मशाळे
3.श्रीजा मनीष सुरवसे
3.मृणाली अरुण शिवगुंडे
3.कन्हैया प्रवीण वाडेकर
3.प्राची बाबुराव पाटील
3.अक्षरा महेपती जाधव
3.श्रावणी सिद्धेश्वर कसबे
3.स्वराली धनंजय जाधव
3.आरोही संतोष कदम
3.निविदेता लक्ष्मण दुलंगे
3.अस्मिता अतुल राऊत
3.आदिती जतीन क्षीरसागर
3.जोया शेख

**आठवी ते दहावी (गट-२) विजयी झालेले स्पर्धक**

1.रुमाना फिरोज शिकलगार
1.सुरभी अतुल साळुंके
1.गायत्री दीपक मोरे
1.दिव्या बळीराम गावडे
1.नाभा नरसिंग वैचाल
2.समृद्धी गुनल
2.समृद्धी लक्ष्मण मस्के
2.माही गोतम कांबळे
2.आर्या सोमनिगा बिराजदार
2.पल्लवी यल्लपा माळी
2.मृणाल बालाजी थिटे
2.दक्ष महेश अडवाणी
2.भावना नादकुमार वाडीपल्ली
२.प्रेरणा चंद्रकांत अधलिंगे
2.हर्ष मुरलीदार कडलास्कर
3.ऋतिका हरिदास श्रीमाळ
3.आर्य अविनाश सुरधे
3.प्रणव धननराज थिटे
3.सानिया सय्यद मुल्ला
3.साई सागर सुरवसे
3.शंतनू किरणकुमार कटरे
3.गौरी गजीनाथ शेजाळ
3.तनुजा अनता थोरवते
3.शरावनी संजय पवार
3.गौरव विलास मलगेरी
3.महेश सुधकर शिंदे
3.समर्थ विकास मालगिरी
3.अरपिता रमेश कुंभार
3.वैभवी विलास शेंडगे
3.लक्ष्मी उमाशंकर कोष्टी

# सोलापूरात ८ मार्चला ‘सप्तम श्री श्याम वंदना महोत्सव’

## श्री श्याम मंदिर चॅरीटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री श्याम मंदिर चॅरिटेबल ट्रस्ट, सोलापूर यांच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही ‘सप्तम श्री श्याम वंदना महोत्सव’ मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला आहे.




रविवार ८ मार्च रोजी होणाऱ्या या महोत्सवानिमित्त शहरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळणार आहे. या महोत्सवात दिल्लीतील प्रसिद्ध भजन गायक तसेच केरळमधील जगप्रसिद्ध ‘कलारीपयट्टू’ कलाकारांचे सादरीकरण हे विशेष आकर्षण ठरणार असल्याची माहिती ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष आनंद खंडेलवाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महोत्सवाची सुरुवात शनिवार ७ मार्च रोजी दुपारी ५ वाजता बाळीवेस मारुती मंदिर येथून भव्य शोभायात्रेने होणार आहे. सोलापूरचे महापौर विनायक कौंड्याल तसेच उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या शुभहस्ते श्री श्याम प्रभूंची पूजा करून शोभायात्रेला प्रारंभ होईल. या शोभायात्रेत दिल्ली येथील झांकी कलाकार पौराणिक वेशभूषेत सहभागी होणार असून शेकडो महिला-पुरुष भाविक मंगलकलश व ध्वजा (निशाण) घेऊन सहभागी होतील. शहरातील विविध मार्गावरून निघणारी ही शोभायात्रा झंवर लॉन्स (जुना कारंबा नाका, सम्राट चौक) येथे विसर्जित होईल. तेथे श्री श्याम प्रभूंची प्रतिष्ठापना व आरती करण्यात येणार आहे.

रविवार ८ मार्च रोजी रंगपंचमीच्या दिवशी दुपारी ४ वाजता झंवर लॉन्स येथे मुख्य सोहळा व भजन संध्या कार्यक्रम पार पडणार आहे. या वेळी विविध धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दिल्ली येथील सुप्रसिद्ध भजन गायिका सोनी सिस्टर्स श्याम भजनांची मेजवानी देणार आहेत. यासोबतच केरळमधील जगप्रसिद्ध मार्शल आर्टचे पथक थरारक कलारीपयट्टू युद्धकलेचे प्रात्यक्षिक सादर करणार आहे. तसेच चिराग ग्रुप्स च्या कलाकारांतर्फे देवदेवतांच्या जिवंत झांक्यांद्वारे चित्ताकर्षक देखावे सादर करण्यात येणार आहेत.

या सोहळ्यात श्री श्याम प्रभूंचे दिव्य दर्शन, अखंड ज्योत तसेच फुलांची होळी (फूलों की होली) हे देखील विशेष आकर्षण असणार आहे. राजस्थानमधील जयपूरजवळील खाटू येथील श्री श्याम मंदिर हे अत्यंत जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. ‘हारे का सहारा’ अशी या देवाची ख्याती असून कार्तिकी व फाल्गुन एकादशीच्या काळात लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात. सोलापूर शहरातही श्री श्याम भक्तांची मोठी संख्या असून ट्रस्टतर्फे आयोजित या महोत्सवाला दरवर्षी मोठा प्रतिसाद मिळतो.

यंदाही सर्व श्याम भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. भजन संध्येसोबत अनेक कलाकार आपली कला सादर करणार असल्याने कार्यक्रम ठरलेल्या वेळेतच सुरू होणार असल्याची नोंद घ्यावी, असेही आयोजकांनी स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेस गोविंद खंडेलवाल, अमर खंडेलवाल, भाग्यश्री खंडेलवाल आणि आरती खंडेलवाल उपस्थित होते.


VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007


# भाजपचा मराठा समाजावर अन्याय

## महापौर पदासाठी अर्धनग्न आंदोलन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** मराठा समाजाला महापौर पदाची संधी नाकारण्यात आल्याचा आरोप करत मराठा क्रांती मोर्चा आणि विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी सोलापुरातील हुतात्मा स्मारकासमोर अर्धनग्न आंदोलन करून तीव्र निषेध नोंदविला. मराठा समाजावर राजकीय अन्याय झाल्याचा आरोप करत आंदोलकांनी संबंधित लोकप्रतिनिधींवर टीका केली आणि समाजाला न्याय देण्याची मागणी केली.



या आंदोलनाचे नेतृत्व मराठा क्रांती मोचार्चे राज्य समन्वयक रामभैय्या जाधव यांनी केले. यावेळी त्यांनी सांगितले की, सोलापूर महानगरपालिकेच्या महापौरपदाची जागा यंदा सर्वसाधारण प्रवर्गासाठी असताना मराठा समाजाला महापौर होण्याची मोठी संधी होती. मात्र ती संधी असूनही मराठा समाजाला पद न देता राजकीय अन्याय करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

आंदोलकांनी यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी तसेच भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांच्यावरही टीका केली. मराठा समाजाला न्याय देऊन महापौरपदी संधी दिल्यास सर्वप्रथम त्यांचा सत्कार करू, असेही आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले.

रामभैय्या जाधव म्हणाले की, १९९३ साली सपाटे यांच्या कार्यकाळानंतर तब्बल ३२ वर्षांपासून मराठा समाजाला महापौर पदाची एकही संधी देण्यात आलेली नाही. मात्र या काळात विविध समाजघटकांना महापौरपद देण्यात आले. तीन वेळा साळी समाजाला, दोन वेळा मुस्लिम समाजाला, दोन वेळा लिंगायत समाजाला, दोन वेळा लमाण समाजाला तर एकदा कैकाडी, धनगर आणि बौद्ध समाजातील प्रतिनिधींना महापौरपदाची संधी देण्यात आली. त्यामुळे मराठा समाजाला सातत्याने डावलले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

या मागणीसाठी गेल्या महिनाभरापासून विविध प्रकारची आंदोलने सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. यामध्ये रक्ताने पत्र लिहिणे, मुंडण आंदोलन, मूक आंदोलन अशा विविध मार्गांनी निषेध नोंदविण्यात आला असून आता अर्धनग्न आंदोलन करून संताप व्यक्त करण्यात आला आहे.

आंदोलकांनी पुढे सांगितले की, मराठा समाजाने लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये संबंधित पक्षाला मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला. मात्र त्यानंतरही समाजाला अपेक्षित न्याय मिळाला नाही. त्यामुळे जिल्हा परिषद निवडणुकीतही मतदारांनी मतपेटीतून उत्तर दिल्याचा दावा त्यांनी केला.

आंदोलनकर्त्यांनी दोन प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. सध्याचे महापौर विनायक कोंड्याल यांनी राजीनामा द्यावा आणि मराठा समाजातील व्यक्तीला महापौरपद द्यावे, अशी पहिली मागणी आहे. अन्यथा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या कार्यकाळात पहिल्या अडीच वर्षांसाठी कुणबी-मराठा समाजाला संधी द्यावी आणि महापौरपदही अडीच वर्षांच्या कालावधीत मराठा समाजाला द्यावे, अशी दुसरी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी आंदोलनस्थळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हा संपर्कप्रमुख छत्रगुण माने, किरण वाघमारे, किरण क्षीरसागर, राहुल जाधव, मारुती सुरवसे, ओंकार धावणे, सागर गायकवाड, संभा व्हळके, अक्षय माळवदकर, बापू शेळके, अमित जाधव, सुदीप पिंपरे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि मराठा समाजातील बांधव उपस्थित होते.

दरम्यान, मराठा समाजाला न्याय न मिळाल्यास हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल आणि त्याची ठिणगी संपूर्ण महाराष्ट्रात पेटू शकते, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला.

## जाहीर प्रसिध्दीकरण
कि. अर्ज नं. ५३८/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात–**

संदीप दिलीप मोटे, वय – ४४ वर्षे, धंदा– शेती. रा. नरखेड, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामसेवक, ग्रामपंचायत नरखेड, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांची बहीण सारीका दिलीप मोटे, उर्फ सारीका सत्यवान ताकमोगे यांचा जन्म हा दि.१०/०५/१९८८ रोजी अर्जदाराचे राहते घरी मौजे नरखेड, ता. मोहोळ येथे झाला आहे. परंतु तिच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत नरखेड, ता. मोहोळ, जि. सोलापूर ग्रामपंचायत जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे. त्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची बहीण सारीका दिलीप मोटे, उर्फ सारीका सत्यवान ताकमोगे यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत नरखेड, यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत अथवा दि.२०/०३/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारास त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे. ता. ०६/०३/२०२६

**तहसिलदार मोहोळ.**


# १८ मार्चला इंगळे स्मृती उद्यानाचे लोकार्पण

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):–** येथील मैंदर्गी रस्त्यावरील हद्दवाड समर्थ पार्क परिसरात उभारण्यात आलेल्या कै. कल्याणराव (बाळासाहेब) इंगळे स्मृती उद्यानाची आ.सचिन कल्याणशेट्टी व नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी पाहणी केली. या उद्यानामुळे अक्कलकोट शहराच्या सौंदर्यात भर पडणार असल्याचे मत नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. मैंदर्गी रस्त्यावरील हद्दवाड समर्थ पार्क येथे श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांच्या पुढाकारातून या स्मृती उद्यानाची निर्मिती करण्यात आली आहे. कै. बाळासाहेब इंगळे यांच्या स्मृतीदिनानिमित्त १८ मार्च रोजी उद्यानाचे लोकार्पण होणार असून, त्याच दिवशी त्यांच्या अर्धपुतळ्याचेही अनावरण करण्यात येणार आहे. यावेळी आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी उद्यानाच्या कामाची दखल घेत हद्दवाढ भागातील विकासकामांना प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. हद्दवाढ भागातील मूलभूत समस्या तातडीने मार्गी लावून त्या भागात आवश्यक विकासकामे करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

या पाहणीवेळी देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, नगरसेवक अविनाश मडिखांबे, प्रथमेश इंगळे, सिद्धेश्वर मठपती, संतोष पराणे, प्रा. शिवशरण अचलेर, मेजर संदीप सलगरे, मनोज जाधव, सुधाकर काशेट्टी, सागर बबनराव इंगळे, बाळासाहेब एकबोटे आदी उपस्थित होते.

# वैराग येथील कोरके आश्रमशाळेत पारंपरिक पद्धतीने होळी

**वैराग (कटूसत्य वृत्त):–** वैराग येथील शिक्षणमहर्षी बाळासाहेब कोरके संचलित इंदिरानगर आश्रमशाळेत होळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक विकास पाटील होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून जय जगदंबा परिवाराचे अध्यक्ष डॉ. कपिल कोरके उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते होळीचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी पालापाचोळा व लाकडे गोळा करून पारंपरिक



पद्धतीने होळी साजरी केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबतच हिंदू सण–परंपरांची ओळख व माहिती मिळावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्राचार्य खंडेराया घोडके यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बाळासाहेब वाळके यांनी केले, तर चंद्रकांत घायतिडक यांनी आभार मानले.


## जाहीर प्रसिध्दीकरण
कि. अर्ज नं. १९३६ / २०२४

**उत्तर सोलापूर येथील मे. तहसिलदार साहेब, यांचे कोर्टात–**

पुजा दत्तु वाबळे, वय– २८वर्षे, धंदा– घरकाम, सध्या रा. डिकसळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामसेवक, ग्रामपंचायत कारंबा, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर. } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी त्यांचा जन्म ता. ७/०५/१९९६ रोजी मौजे कारंबा, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथे झालेला आहे. परंतु त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कारंबा, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर चे ग्रामपंचायतला जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे. त्याअर्थी वर नमुद अर्जदार यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कारंबा, ता. उत्तर सोलापूर यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन पंधरा दिवसाचे आत अथवा दि. २०/०३/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे. ता.०६/०३/२०२६

**तहसिलदार उत्तर सोलापूर.**

## जाहीर प्रसिध्दीकरण
कि. अर्ज नं. २२२/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात–**

वजीर बादशहा पठाण, वय ५८ वर्षे, धंदा व्यापार, रा. ५२५. बारंगुळे प्लॉट बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर, } **अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामसेवक, ग्रामपंचायत डिकसळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार वजीर बादशहा पठाण यांचा जन्म हा दि. ०१/०६/१९६७ रोजी अर्जदाराचे राहते घरी मौजे डिकसळ, ता. मोहोळ येथे झाला आहे. परंतु त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत डिकसळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर ग्रामपंचायत जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे. त्याअर्थी वर नमुद अर्जदार यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत डिकसळ, यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत अथव दि.२०/०३/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारास त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे. ता. ०६ / ०३ / २०२६

**तहसिलदार मोहोळ.**


# बनावट दिव्यांग प्रमाणपत्रावर नोकरी; ३१६ जणांवर कारवाई

**मुंबई (कटूसत्य वृत्त):–** राज्यातील काही शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून नोकरी मिळवल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणात राज्य सरकारने कठोर कारवाईची प्रक्रिया सुरू केली असून आतापर्यंत ३१६ अधिकारी–कर्मचाऱ्यांवर शिस्तभंग, लाभांची वसुली आणि निलंबनाची कारवाई करण्यात येत आहे.



राज्यातील २८ जिल्हा परिषदांमधील एकूण १०,९२२ दिव्यांग अधिकारी–कर्मचाऱ्यांची पडताळणी प्रक्रिया सुरू आहे. त्यापैकी ६,२१८ जणांची तपासणी पूर्ण झाली असून त्यात ३१६ जणांकडे वैध दिव्यांग प्रमाणपत्र नसणे, बनावट प्रमाणपत्र सादर करणे किंवा ४० टक्क्यांपेक्षा कमी दिव्यांगत्व असणे असे प्रकार आढळून आले आहेत. याबाबत माहिती दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिली.

हे प्रकरण समोर आल्यानंतर भाजप आमदार श्रीकांत भारतीय यांनी विधानसभेत लेखी प्रश्न उपस्थित करून सरकारचे लक्ष वेधले होते. त्याला उत्तर देताना मंत्री सावे यांनी सांगितले की, संबंधित अधिकारी–कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई, मिळालेल्या लाभांची वसुली आणि निलंबन अशी कठोर पावले उचलण्यात येत आहेत.

दरम्यान, अजूनही हजारो कर्मचाऱ्यांची पडताळणी बाकी असून दिव्यांग योजनांचा गैरवापर रोखण्यासाठी राज्यातील सर्व ३४ जिल्हा परिषदांना व्यापक तपासणीचे आदेश देण्यात आले आहेत.

दिव्यांग कल्याण विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी या संदर्भात निर्देश दिले आहेत.

या कारवाईमुळे बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्यांना स्पष्ट इशारा मिळाला असून पुढील काळात या प्रकरणात आणखी कठोर पावले उचलली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मध्यपूर्वेतील युद्धाचा शेतकऱ्यांना फटका सरकारने हस्तक्षेप करावा



**पुणे, (कटूसत्य वृत्त):–** मध्यपूर्वेत अमेरिका, इजराइल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाचा थेट परिणाम महाराष्ट्रातील शेतकरी आणि व्यापाऱ्यांवर होत आहे.जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) बंदरावर राज्यातून निर्यातीसाठी पाठवण्यात आलेले केळी, द्राक्षे आणि कांद्याचे सुमारे दोन हजार कंटेनर अडकून पडल्याने मोठे आर्थिक नुकसान होतेय. अशात केंद्रासह राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करीत निर्यातीसाठीचा पर्यायी मार्गाची चाचपणी करावी तसेच युद्धामुळे निर्यातदारांचा वाढलेला खर्च कमी करून शेतकरी, व्यापाऱ्यांना दिलासा मिळवून द्यावा; अशी मागणी भारत अगेन्स्ट करप्शनचे (भाअक) राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी गुरूवारी (ता.५) केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जागतिक किर्ती आणि सर्वमान्य नेतृत्व लक्षात घेता मध्यपूर्वेतीन युद्ध थांबवण्यात ते मोठी भूमिका निभावू शकतात. हे युद्ध आणखी काळ चालले तर त्याच्या आणखी वेदनादायक झळा शेतकरी आणि देशातील निर्यातदारांना बसेल, असे देखील पाटील म्हणाले. दरम्यान, आंतरराष्ट्रीय शिपिंग कंपन्यांनी कार्गो कंटेनरवर २ ते ४ हजार डॉलर्सपर्यंत अतिरिक्त 'आपत्कालीन संघर्ष अधिभार' लावण्याचा निर्णय घेतला आहे. अचानक वाढलेल्या खर्चाचा फटका थेट व्यापारी, शेतकऱ्यांना बसत असल्याचे पाटील म्हणाले.

जेएनपीटी बंदरावर हजारो कंटेनरच्या रांगा लागल्या असून निर्यात प्रक्रिया पूर्णपणे विस्कळीत झाली आहे.युद्ध दूरच्या देशांत सुरू असले तरी त्याचा फटका महाराष्ट्रातील शेतकरी, व्यापाऱ्यांना बसत असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले. केंद्र व राज्य सरकारने शिपिंग कंपन्यांशी तातडीने चर्चा करून हा अधिभार कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत तसेच निर्यात अडथळे दूर करण्यासाठी विशेष उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पाटील यांनी केली आहे.


महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता,**
**यांत्रिकी विभाग,सोलापूर, कुमठा नाका,उजनी वसाहत, सोलापूर–४१३००३.**

Email ID- eemdsolapur@gmail.com, दूरध्वनी क्रमांक. (०२१७) २९९०७१४

**ई–निविदा सूचना क्रमांक ३० सन २०२५–२०२६.**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहे. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत, सविस्तर निविदा सूचना व ई– निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदेची किंमत रुपये (जी.एस.टी. व विमा वगळून) |
|---|---|---|---|
| १ | सिना कोळेगाव, परांडा बाजु उपसा सिंचन योजना येथील पंपाचे वार्षिक परिचलन व किरकोळ दुरुस्ती कामे (सन २०२५–२०२६, २०२६–२०२७, २०२७–२०२८) करिता | सोलापूर | रु ३५,८८,००८/– |

ई–निविदा उपलब्ध कालावधी :– दिनांक – ०९/०३/२०२६ (सकाळी ११ पासून) ते दिनांक – १७/०३/२०२६ (सायं ६.०० वाजता पर्यंत

ई–निविदा उघडण्याचा दिनांक :– २०/०३/२०२६ ( सकाळी १२ वाजता)

महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१२१७/प्र.क्र.११४/१७)/यांत्रिकी दिनांक ०५/०७/२०१८ आणि शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण–०५२३/(प्र.क्र.२५/२०२३) /यांत्रिकी दिनांक २४/१०/२०२४. शासन निर्णय निविदा ४१७/प्र.क्र.२४७/१७ दि.१८/१०/२०२३ अन्वये करारनाम्यात अनुक्रमे पश्चात अर्हता निकष व इतर सर्व अटी लागू राहतील.

खालील संकेतस्थळावर ई–निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

http://mahatenders.gov.in (सदर निविदासचनेमध्ये काही बदल होत असल्यास सदर वेबसाईटवर कळविण्यात येईल.).

निविदा सादर करणारे कंत्राटदार जलसंपदा विभागातील यि संघटने पंजीकृत असणे आवश्यक नाही.

जावक क्र./यां.वि.सोलापूर./लेखा–२/निविदा/५२८/सन २०२६.
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर यांचे कार्यालय
दिनांक :– २४/२/२०२६.

**सही/–**
**कार्यकारी अभियंता**
**यांत्रिकी विभाग, सोलापूर**

जिमाका/सो/जाहि/३५२/२५–२६


# जिंकण्यासाठी जिद्द, धैर्य व चिकाटी असावी– एव्हरेस्टवीर आनंद माळी

**पिंपरी, पुणे (कटूसत्य वृत्त):–** कोणत्याही स्पर्धेत जिंकण्यासाठी आपल्यामध्ये जिद्द, धैर्य व चिकाटी असावी लागते. त्याला योग्य मार्गदर्शकांची साथ मिळाली की यश नक्की मिळते. सांघिक अथवा वैयक्तिक अशा कोणत्याही खेळात सहभाग घेतल्याने मानसिक, भावनिक आणि शारीरिक स्वास्थ्य उत्तम राहते असे मार्गदर्शन ज्येष्ठ क्रीडापटू व एव्हरेस्ट वीर आनंद माळी यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट तर्फे ह्युवोत्सव २०२६ह्न हा तीन दिवसीय क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या युवोत्सव स्पर्धेत बॉक्स क्रिकेट मुले २० संघ, मुली १२ संघ, हॉलीबॉल २४ संघ, फुटबॉल ३६ संघ आणि आयपीएल ऑक्शन यामध्ये ११ संघांनी भाग घेतला होता. त्यात १००० पेक्षा अधिक विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ आनंद माळी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी एसबीपीआयएम च्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर, समन्वयक प्रा. डॉ. अमरीश पद्मा, डॉ. ऋषिकेश कुमार, प्रा. पूर्वा साने आदी उपस्थित होते.

संस्थेच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्राचे महत्त्व सांगताना म्हटले की खेळामुळे नेतृत्वगुण, संघभावना व शिस्त विकसित होते.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणेः मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयाने इंदिरा महाविद्यालयावर १ धावांनी म्हणजे २० विरुद्ध १९ असा विजय मिळविला.

मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयाने इंदिरा महाविद्यालयावर ७ धावांनी म्हणजे ३५ विरुद्ध २८ असा विजय संपादन केला.

व्हॉलीबॉल स्पर्धेत पीसीसीओई संघाने एमआयटीएडीटी विद्यापीठावर २–० (२५–२१, २५–२२) असा विजय मिळविला.

फुटबॉल स्पर्धेत गरवारे महाविद्यालयाने डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, पिंपरी संघावर पेनल्टी शूट आऊटमध्ये ५–४ असा विजय मिळविला. श्री बालाजी युनिव्हर्सिटी संघाला तृतीय क्रमांक मिळाला.

विद्यार्थी समन्वयक व आयोजन समिती सदस्य प्रशांत सायस, सिद्धेश जामोडे, वैभव वाघेरे, धीरज सोनार, ऋषिकेश मुक्कावर, गायत्री घुले, हर्षदा बाबर, कुणाल निकम व अजय गिट्टे यांनी संयोजनात सहभाग घेतला.



सूत्रसंचालन आर्या सरदेशपांडे, दिया बंसल व श्रावणी कनोरे यांनी केले. स्पर्धेतील सर्व विजेत्या संघांना प्रशस्तीपत्र, पारितोषिके बक्षीस देण्यात आली. प्रायोजक व पंचांचा देखील सत्कार करण्यात आला. युवोत्सव मध्ये लकी ड्रॉ मधील प्रथम विजेत्या विद्यार्थ्यार्ला अँड्रॉईड टीव्ही आणि दोन खेळाडूंना स्पीकर्स बक्षीस देण्यात आले.


## चौकशीची जाहीर नोटीस
एस.आर.एन.क्रमांक: SLP/04488/18/25
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:–१८४१/२०२५

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग, सोलापूर.**

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर हळचिंचोली बाबत न्यासाचा पत्ता:– मालमत्ता नं ३४६, अट पोस्ट हळिचंचोली, ता.अक्कलकोट, सोलापूर, } **अर्जदार**
अक्कलकोट, हलचिंचोली अर्जदार–सेनापती आडव्यप्पा बीराजदार,

सर्व संबंधित लोकास जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत:–

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | tal 12 nag | २४००.०० |
| २ | mrudung 1 nag | ४०००.०० |
| ३ | sangeet peti 1 nag | ४०००.०० |
| ४ | veena | १५००.०० |
| ५ | samai 1 nag | ४००.०० |
| ६ | ghanti 1 nag | २५००.०० |
| ७ | speakar set | ८०००.०० |
| ८ | niranjan 1 nag | ७००.०० |
| ९ | pitali ghaghar 1 nag | ५००.०० |

(अ) जंगम मिळकत : रोख रु.२४०००/–मात्र(अक्षरी रुपये चोवीस हजार मात्र फक्त)

स्थावर मिळकत (वर्णन):–

| शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| 1) At post halchincholi | malmatta no 348 boudr.East-Mokali jaga va zilla p | 1089 sq.ft. | at halchincholi taluka akkalkot dist solapur | own property of diety | 0.00 |

(ब) स्थावर मिळकत : रोख रु. ०/– मात्र

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ०५–०३–२०२६ रोजी दिली.

कोर्टाचा शिक्का

**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,सोलापूर विभाग,सोलापूर.**



## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

–: संपर्क :–
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल–सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

### वर–वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**


सभी जातियों के विरशैव लिंगायत वर–वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर–वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु–वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779



**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) देशाचे संरक्षणमंत्री २) देशाचे रस्ते वाहतूक व बांधकाम मंत्री- नितीन **** ३) भीती (हिंदीत) ४) मच्छीमारी करून उदरनिर्वाह करणारा वर्ग ५) नदीवर बांधलेला साकव, ब्रीज ६) पुष्कळ, भरमसाठ ७) सावकाश मंद गतीने चालणारा एक छोटा प्राणीजीव ९) श्रवणेंद्रिय ११) एक माजी मंत्री-***** पाचपुते १६) दुसऱ्याच्या मनातील ओळखणारा १७) भारताचा माजी कर्णधार व सध्या बीसीसीआय अध्यक्ष - सौरभ *** २०) ब्रेड, केक इत्यादी पदार्थ जेथे बनविले जातात ती जागा २२) शर्ट (ग्रामीण भाषेत) २३) पाकचे माजी पंतप्रधान २७) स्त्रियांचा नाकात घालण्याचा दागिना २९) दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री-** दीक्षित ३०) लष्करातील सैनिकाला शौर्याबद्दल दिले जाणारे मेडल- ***** चक्र ३१) वाळवंट प्रदेश असलेले भारतातील राज्य ३२) लायब्ररी (मराठीत) ३३) चार गुणिले चार ३६) सातारा जिल्ह्यातील फुलांसाठी जगप्रसिध्द असलेले पठार ३९) जरचा साथीदार ४१) कौशल्य ४३) एखाद्या गोष्टीचा घेतलेला ध्यास ४४) ख्रिश्चन धर्मसेविका ४५) टिकून राहणे, गत उलट लिहा

**आडवे शब्द :** १) खा. सुनील तटकरे यांचा लोकसभा मतदारसंघ
४) जोतिबा, अंबाबाई देवस्थान पश्चिम महाराष्ट्रातील या जिल्ह्यात आहे
७) या राज्याची राजधानी पणजी आहे ८) सिंहाचे जोराचे ओरडणे
१०) धांदल, घाई १२) अनिल कपूर अभिनीत एक राजकारणावर आधारित चित्रपट
१३) उन्हाळ्यातील एक महिना १४) दुप्पट (इंग्रजीत)
१५) कागदाचे वीस दस्त्यांचे माप, सायकलचे चाक
१६/अ) श्रीगणेशाचा एक मंत्र-* गं गणपतये नमः १८) मोठा ढोल
१९) दमयंती पती २०) बिहारमधील मंत्री गिरीराजसिंह यांचा लोकसभा मतदारसंघ
२१) विनाकारण, नाहक २३) बनावट २८) विठ्ठल भक्तांचे पंढरीला पायी जाणे
३०) मार्ग, रस्ता ३१) राजाचे भव्य निवासस्थान ३३) सुशीलकुमार शिंदे यांचा लोकसभा मतदारसंघ ३४) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा **
३५) याचे कणीस भाजून खातात ३७) श्वसनेंद्रिय
३८) चालरूढ, पध्दत ४०) सात गुणिले तीन
४२) आश्चर्य ४४) तिरस्कार (हिंदीत) ४६) शिक्षकांना या नावाने संबोधतात
४७) पोलीस दलाच्या वाहनांच्या येण्याची सूचना करण्यासाठी मोठा आवाज करणारे लावतात ते ४८) श्रीमंतच्या विरूध्दार्थी शब्द ४९) मोफत (इंग्रजीत)

## सुडोकु – 193

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 3 | 4 | 2 | 7 | 5 | | |
| | | 7 | | 1 | 5 | 3 | | |
| | 2 | 4 | 6 | 8 | | | | 7 |
| 3 | | | 7 | 6 | | 2 | 1 | 9 |
| 6 | | | | | | | | |
| | | | 1 | 3 | | | | |
| 4 | | 5 | 8 | | | 9 | 2 | 6 |
| | | 1 | 2 | | 6 | | 7 | 3 |
| | 7 | | | | 9 | 8 | | |

# डॉ.धवलसिंह यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर संपन्न




**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** लोकप्रिय नेतृत्व डॉ.धवलसिंह मोहिते–पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला, तरुणाईचा आणि कार्यकर्त्यांचा मोठा प्रतिसाद लाभला.

शिबिराचे' उदघाटन जनसेवा संघटनेचे नेते माणिकराव मिसाळ, अण्णासाहेब शिंदे, राजू गुळवे, रणजितसिंह देशमुख, सुधीर रास्ते यांचे हस्ते करण्यात आले.या शिबिरात एकूण ११७ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली. वाढदिवसाचा कोणताही अनावश्यक खर्च टाळून, समाजासाठी उपयुक्त उपक्रम राबवण्यात आला होता.

सकाळी १० वाजल्यापासूनच कार्यकर्त्यांनी आणि नागरिकांनी रक्तदान केंद्रावर गर्दी केली होती.

केवळ युवकच नव्हे तर महिलांनीही या मोहिमेत हिरीरीने सहभाग नोंदवला. अक्षय रक्तपेढीच्या माध्यमातून एकूण ११७ रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले, ज्याचा उपयोग गरजू रुग्णांसाठी केला जाणार आहे. यावेळी सर्व रक्तदात्यांना आयोजक तांच्या वतीने सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना आयोजक राजु गुळवे यांनी सांगितले की,"डॉ. धवलसिंह मोहिते–पाटील यांचे नेतृत्व नेहमीच जनसेवेला प्राधान्य देतात, त्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्ताचा प्रत्येक थेंब कोणाचे तरी प्राण वाचवण्यासाठी कामी येईल हाच आमचा मुख्य उद्देश आहे असे सांगितले."अकलुज व परिसरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी या रक्तदान शिबिराला भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले आणि डॉ.धवलसिंह मोहिते–पाटील यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जनसेवा संघटनेचे राजु गुळवे, सुधीर रास्ते, प्रताप कोकीळ, सतिश साठे, बबनराव शेंडगे, रणजितसिंह देशमुख, प्रताप झंजे,चंद्रकांत गायकवाड,गणेश महाडीक, ज्योती कुंभार, नवनाथ साठे, संजय गाडे, अनिल सोनार, रघुनाथ साठे, हिरा खंडागळे, शिवाजी जाधव, राजेश पवार, अभिजीत माने, मुबारक कोरबु, अजित पवार, निखिल फुले,बशीर शेख, अण्णा सुरवसे, कन्हैया चव्हाण, अनिल ओरसे, पिंटु वैद्य, इस्लाम पटेल, सोमनाथ कोरे,बाबु चव्हाण, पिंटु कदम, फिरोज देशमुख, राहुल जाधव, रोहिदास हनवते, अरुण शहाणे, शेखर शेंडे, आप्पा जाधव, यांनी विशेष परीश्रम घेतले.

# एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठामध्ये स्वामी विवेकानंदांच्या पुतळ्याचे अनावरण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रनिर्मिती, युवा शक्ती आणि आध्यात्मिक मूल्यांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठामध्ये येत्या ७ मार्च रोजी सकाळी ११ वाजता श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र अयोध्या ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या शुभहस्ते होणार आहे. नालंदा विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि 'परम' महासंगणकाचे शिल्पकार पद्मभूषण डॉ. विजय भटकर, श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूरचे उपाध्यक्ष सद्गुरू गहिनीनाथ महाराज औसेकर या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत व माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा संपन्न होणार आहे. याप्रसंगी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे, विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी तसेच संस्थेचे विश्वस्त आणि पदाधिकारी उपस्थित असणार आहेत.

माईर्स एमआयटी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आणि युनेस्को मानवाधिकार, लोकशाही व शांतता चेअरधारक विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माईर्स एमआयटीच्या विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड चाटे यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर येथे एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. विद्यापीठामध्ये उभारण्यात आलेला स्वामी विवेकानंदांचा पुतळा हे केवळ एक स्मारक नसून विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरणार आहे. त्यांचे विचार, राष्ट्रभक्ती, मानवता आणि शांतीचा संदेश तरुण पिढीला नवी दिशा देणारा आहे. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी सोलापूरमधील सर्व क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

# ७ मार्चला 'टेकनोक्रेस्ट २०२६' चा थरार दीड लाखांची बक्षिसे




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 'भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग'च्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी "टेकनोक्रेस्ट २०२६" या भव्य राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ७ मार्च रोजी होणाऱ्या या महोत्सवासाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन नोंदणी प्रक्रिया अधिकृतपणे सुरू झाली असून, देशभरातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आले.

' विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मिळणार हक्काचे व्यासपीठ " या महोत्सवाच्या माध्यमातून राज्यातील अभियांत्रिकी (Degree), पदविका (Diploma) तसेच विज्ञान (Science) क्षेत्रातील विद्यार्थ्यांना त्यांचे तांत्रिक कौशल्य आणि नाविन्यपूर्ण कल्पना सादर करण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येत आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून, विद्यार्थ्यांनी प्रॅक्टिकल नॉलेजवर भर द्यावा, या उद्देशाने या महोत्सवाची व्याप्ती वाढवण्यात आली आहे.

या एक दिवसीय तांत्रिक कुंभात वैविध्यपूर्ण स्पर्धांची मेजवानी असणार आहे. यामध्ये प्रामुख्याने या नॅशनल हॅकाथॉन, प्रोजेक्ट आयडिया कॉम्पिटिशन, रोबोटिक्स व ब्रिज मेकिंग, पेपर व पोस्टर प्रेझेंटेशन, क्विज कॉम्पिटिशन व रील मेकिंग, मॉडेल एक्झिबिशन असे या स्पर्धेच्या विषयाचे आयोजन करण्यात आले आहे या महोत्सवात महाराष्ट्रसह कर्नाटक, तेलंगणा आणि देशातील विविध राज्यांमधून सुमारे १५०० विद्यार्थी सहभागी होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विजेत्या स्पर्धकांसाठी एकूण १ लाख ५० हजार रुपयांची भरघोस रोख पारितोषिके आणि सन्मानचिन्हे देण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे, सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला 'राष्ट्रीय स्तरावरील सहभागाचे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना संस्थेचे प्राचार्य डॉ. अनिल देशमाने म्हणाले की, "तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी मिळावी, हाच आमचा मुख्य हेतू आहे."

संस्थेचे अध्यक्ष इंजि. रवींद्रजी गायकवाड आणि सचिव सौ. अनामिका गायकवाड यांनी आपले मत व्यक्त करताना सांगितले की, "हा केवळ एक कार्यक्रम नसून, भविष्यातील तंत्रज्ञांना एकत्र आणणारा एक विचार आहे. तंत्रज्ञान हे देशाच्या प्रगतीचे मुख्य इंजिन आहे. 'विकसित भारत' घडवण्यासाठी लागणारे तांत्रिक कौशल्य विद्यार्थ्यांना देण्याचा आमचा हा प्रयत्न आहे. यावर्षीचा महोत्सव मागील वर्षांच्या तुलनेत अधिक भव्य आणि नाविन्यपूर्ण असेल."

कार्यक्रमाचे उद्घाटन ७ मार्च रोजी सकाळी १० वाजता कॉलेज कॅम्पसमध्ये होणार आहे. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक प्रा. विजयकुमार कोळकुरे, नोंदणी प्रमुख प्रा. अमित वडवेराव यांच्यासह सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थी प्रतिनिधी अहोरात्र परिश्रम घेत आहेत.

राज्यातील जास्तीत जास्त अभियांत्रिकी आणि विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी या तांत्रिक महाकुंभात सहभागी होऊन आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करावे, असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत समाधान शिबिर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार 'श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत उत्तर सोलापूर तहसील कार्यालयाच्या वतीने विविध ठिकाणी समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरांमधून नागरिकांना सेतू केंद्रातील दाखल्यांपासून ते शासनाच्या विविध योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार नीलेश पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या समाधान शिबिरांमध्ये मंडल स्तरावर नागरिकांना उत्पन्न, जात आदी महत्त्वाचे दाखले देण्यात येणार आहेत. तसेच सातबारा वाचन आणि 'जिवंत सातबारा' उपक्रम राबविण्यात येणार आहे. गरजू कुटुंबांना नवीन रेशनकार्डचे वितरण करण्यात येणार असून संजय गांधी निराधार योजना अंतर्गत लाभार्थ्यांनाही मदत मिळवून देण्यात येणार आहे.

याशिवाय आरोग्य विभागाच्या माध्यमातून नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. पोस्ट कार्यालय, बँका, सहकार विभाग, कृषी विभाग आदी शासकीय यंत्रणांच्या योजनांची माहिती व लाभ पात्र नागरिकांना देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. पात्र शेतकऱ्यांना तीन लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्याची सुविधाही या शिबिरांमधून दिली जाणार आहे.

या शिबिरात आरटीओ, मुद्रांक विभाग, महावितरण, महिला व बालकल्याण विभाग, ग्रामपंचायत विभाग तसेच बांधकाम विभागही सहभागी होणार आहेत. नागरिकांच्या वैयक्तिक तसेच सामूहिक योजनांच्या अर्जांवर त्वरित कार्यवाही करण्याचा प्रयत्न या अभियानातून होणार असल्याचे तहसीलदार पाटील यांनी स्पष्ट केले.

या अभियानाअंतर्गत ७ मार्च रोजी तिहे कोंडी, १४ मार्च रोजी बडाळा व मार्डी, १० एप्रिल रोजी बाळे व शेळगी, १७ एप्रिल रोजी सोरेगाव, ८ मे रोजी सोलापूर शहरात तसेच १५ मे रोजी मजरेवाडी येथे समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांमुळे नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी आणि त्वरित मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

# वाळू माफियांच्या हल्ल्यात महसूल कर्मचारी पथकातील दोघे जखमी



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** गौण खनिज महसूल पथकाने वाळूसह पकडलेला टिपर कारवाई करण्यासाठी घेऊन जात असताना वाटेत पाठीमागून आलेल्या वाळू माफियांनी आपली. चारचाकी शासकीय वाहनांना आडवी लावून शिवीगाळ, दमदाटी केली व दगडाने हल्ला केला. त्यात महसूलचे दोन कर्मचारी जखमी झाले आहेत तर दगडाने शासकीय व खासगी वाहनांवर हल्ला करून काचा फोडून २० हजार रुपयांचे नुकसान केले. दरम्यान, या घटनेनंतर तीन जण त्याच कारमधून तेथून पळून गेले. ही घटना बुधवारी पहाटे ३:४० च्या सुमारास कडलास (ता. सांगोला) येथील पांढरे वस्तीनजीक घडली.

याबाबत सांगोलाचे मंडळ अधिकारी महेश गणपत जाधव (रा. शिवाजीनगर, सांगोला) यांनी फिर्याद दिली असून, पोलिसांनी अतुल गावडे, पप्पू बिचुकले (दोघेही रा. जवळा, ता. सांगोला) यांच्यासह अज्ञात टिपर चालकाविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला.

सांगोला तहसीलदार बाळूताई भागवत यांच्या आदेशानुसार, सांगोला तालुक्यातील नद्यांमधून विनापरवाना वाळू उपसा करून अवैधरित्या चोरून वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी गौण खनिज महसूल पथकातील सांगोला मंडळ अधिकारी महेश जाधव, ग्राम महसूल समाधान सुर्यगंध व सुनील गोडसे, शासकीय वाहनचालक दिलीप काळे असे मिळून सरकारी वाहन क्र. (एमएच ४५ एएल ८१७१) व खासगी वाहन क्रं. (एमएच ४५ एयू ६७३१) त्यावरील चालक रणजित देशमुख (रा. सांगोला) असे भरारी पथक दोन्ही वाहनांतून कडलास ते जवळा रोडने निघाले होते. त्यावेळी अधिकारी गौरव कुंभार, महसूल सेवक म्हसोबा मंदिराजवळ समोरून टिपर अतुल गावडे यांनी वाळूचा टिपर माझा असून, तुम्ही कशी वाळू घेऊन जाताय, तुम्हाला आता जिवंत सोडत नाही, असे म्हणून कार मागे–पुढे करून पथकातील कर्मचाऱ्यांच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पप्पू बिचकुले, अतुल गावडे यांनी त्याठिकाणी पडलेले दगड उचलून मारण्यास सुरुवात केली. यावेळी दगड कर्मचारी सुनील गोडसे यांच्या डाव्या हाताच्या अंगठ्याला लागल्याने ते जखमी झाले.

येताना दिसला म्हणून त्याला थांबवले असता, चालक अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला. शासनाची कोणतीही रॉयल्टी अथवा परवानगी न घेता कोरडा नदीपात्रातून चोरीची वाळू वाहतूक होत होती. यावेळी पकडलेला टिपर पुढील कारवाईकरिता सांगोला तहसील कार्यालय येथे घेऊन जात असताना वाटेत हा हल्ल्याचा प्रकार घडला.

# जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता शिबीर संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हयातील सर्व माजी सैनिकांना त्यांच्या आवडीनुसार योग्य तो कौशल्य विकास अभ्यासक्रम निवडता यावा आणि त्यांचे प्रभावी पुनर्वसन व्हावे यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हा स्तरावर समुपदेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये सहाय्यक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र संगीता खंदारे, माजी कौशल्य विकास अधिकारी दत्तात्रय देवळे, जिल्हा कौशल्य विकास सहाय्यक तज्ञ समुपदेशक/अधिकारी पार्थ तेरकर यांनी तालुकास्तरावरील व जिल्हा स्तरावरील विविध कोर्सेसची व अल्पबचत गट स्थापनेबाबतची सखोल उपस्थितांना मार्गदर्शन केले. सदर शिबिराकरीता जिल्ह्यातील एकूण 55 माजी सैनिक, माजी सैनिक विधवा पत्नी तसेच कार्यालयाकडील कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद देवदत्त तुंगार यांनी केले. जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता बाबतची पार्श्वभूमिका दत्तात्रय देवळे यांनी मांडली व कार्यक्रमाचे आभार सहाय्यक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी पवार संजीव व्यंकटराव यांनी व्यक्त केले.

# स्वकृत्ववाने प्रगतीची झेप घेणाऱ्या महिला संपूर्ण जगाला प्रेरणादायी- नगराध्यक्षा प्राजक्ता पाटील




**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** जागतिक महिला दिना निमित्त मोहोळ शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने उपनगराध्यक्ष दत्तात्रय खवळे मा. नगरसेवक मुस्ताक शेख यांच्या संकल्पनेतून ए.बी.एस ग्रुप व सनराइज क्लब यांच्या संयुक्त विद्यमानाने भव्य लकी ड्रॉ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनगर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष प्राजक्ता अजिंक्यराणा पाटील होत्या तर यावेळी या प्रमुख अतिथी अनगर नगरपंचायतीच्या नगरसेविका जुलेखा मुलाणी उपस्थित होत्या.

यावेळी महिलांनी आपल्या स्वकर्तुत्वाने चुली पासून आकाशापर्यंत झेप घेतली पाहिजे असे प्रतिपादन अनगर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा प्राजक्ता पाटील यांनी केले. उपस्थीत महिलांना महिला दिनच्या शुभेच्छा दिल्या. आयोजक नगरसेवक मुस्ताक शेख नगरसेवक दत्तात्रय खवळे यांचे अभिनंदन करून दरवर्षी असेच सामाजिक उपक्रम राबवावे असेही यावेळी पाटील म्हणाल्या. यावेळी शितल क्षिरसागर, अँड. रोहिणी सुतार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

ही स्पर्धा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथे २ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता झाल्या. या स्पर्धेचे पहिले बक्षीस वॉशिंग मशीन या बक्षीसचे मानकरी विभुते ह्या ठरल्या ३ कुलर, ३ टेबल फॅन, ३ सोन्याची नथ, ३ इस्त्री, ३ हळदी कुंकू करंडा,१०० पैठणी अशा बक्षीसांचा समावेश होता. या स्पर्धेसाठी मोहोळ शहरातील महिलांनी सहभाग नोंदवला. यावेळी नगरसेवक मुस्ताक शेख यांनी उपस्थित महिलांना शुभेच्छा देत सर्वांचे आभार मानले.

यावेळी उपनगराध्यक्ष दत्तात्रय अण्णा खवळे, नगरसेविका शाईस्ता परवीन मुस्ताक शेख, नगरसेविका सरिता सुरवसे, शितल क्षिरसागर, नगरसेविका भारती बरे, आराधना दत्ता खवळे, यशोदा कांबळे, स्मिता कोकणे, अँड. रोहिणी सुतार, कल्पना खंदारे, सबा शेख, इत्यादी सह मोहोळ शहरातील शेकडो महिला उपस्थित होत्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सनराईज क्लब व एबीएस ग्रुपच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# पांगरीत सोपल स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा रंगला



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यातील पांगरी येथील स्व. शोभाताई सोपल इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पांगरीच्या कन्या तथा सपोनि जरीना बागवान या होत्या. विलेपार्ले (मुंबई) येथे कार्यरत न्यायाधीश प्रमोदिनी मुळे–टेकाळे, पत्रकार गणेश गोडसे, बाबा शिंदे, आसिफ मुलाणी, शंकर लाखे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून स्नेहसंमेलनाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी श्रीराम जाधवर, अण्णा डोके, राजकुमार शिंदे, संतोष खवले, राहुल बगाडे, राम बसाटे, प्रशांत मुंडे, असीम शेख, भारत काळे, गणेश चौधरी, 'सरपंच दि पावर' चित्रपटाचे अभिनेते महादेव जाधवर, संगीतकार भूषण देवकर तसेच संस्थेचे संस्थापक विनायक गरड आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी राज्यस्तरीय शालेय आस्टेंडू आखाडा स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणारी पलक राजेंद्र वाघे तसेच तृतीय क्रमांक मिळवणारा समर्थ बिभीषण सांगळे यांचा प्रशालेतर्फे सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात संस्थापक विनायक गरड यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा मांडला. न्यायाधीश प्रमोदिनी मुळे–टेकाळे यांनी ग्रामीण भागात उत्कृष्ट शिक्षणाचा पाया उभारण्यासाठी विनायक गरड यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगितले. पत्रकार गणेश गोडसे यांनी शोभाताई सोपल स्कॉलरशिप या सामाजिक उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

स्नेहसंमेलनाची सुरुवात श्री विघ्नहर्त्याच्या वंदनेने 'या रे या सारे या गणेशाच्या' या गीताने झाली. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, कोळी नृत्य, छत्रपती शिवाजी महाराजांवरील सादरीकरण, अंधश्रद्धा निर्मूलन, वृक्षलागवड यांसारख्या विषयांवरील कार्यक्रम तसेच छत्रपती संभाजी महाराजांवर आधारित नाटक सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी समृद्धी कारंडे, पलक वाघे, भारती चौधरी व गौरी चौधरी यांनी केले, तर मुख्याध्यापिका चांदणे यांनी आभार मानले.

# सोलापूरच्या शेतकऱ्यांना पीक विम्याची प्रतीक्षा

## आ. मोहिते पाटील यांनी विधानमंडळात मांडला मुद्दा



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पीक विमा भरूनही अनेकांना अद्याप नुकसानभरपाई मिळत नसल्याचा गंभीर प्रश्न आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी विधानमंडळात उपस्थित करून पीक विम्याच्या नुकसानभरपाईस होत असलेल्या विलंबावर लक्ष वेधले.

खरीप हंगाम २०२५ मध्ये सोलापूर जिल्ह्यात सुमारे ३ लाख ३२ हजार ३११ शेतकऱ्यांनी सुमारे २ लाख ५१ हजार हेक्टर क्षेत्रासाठी पीक विमा घेतला आहे. मात्र अतिवृष्टी, पूर, पाणी साचणे तसेच पिके वाहून जाणे यामुळे नुकसान झालेल्या अनेक शेतकऱ्यांना अद्याप नुकसानभरपाई मिळाली नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून होत असल्याचे आमदार मोहिते पाटील यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

यावर उत्तर देताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, प्रधानमंत्री पीक विमा योजनेतील निकषांनुसार पीक कापणी प्रयोगावर आधारित उत्पादन घट लक्षात घेऊन नुकसानभरपाई दिली जाते. सोलापूर जिल्ह्यात खरीप २०२५ हंगामात ३.३२ लाख विमा अर्जदार शेतकऱ्यांनी सुमारे २.५१ लाख हेक्टर क्षेत्रासाठी विमा घेतला असून केंद्र व राज्य शासनाकडून सुमारे १५१.१७ कोटी रुपये विमा हप्ता भारतीय कृषी विमा कंपनीला उपलब्ध करून देण्यात आला आहे. सध्या योजनेंतर्गत पीक उत्पादनाची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया सुरू असून उत्पादनातील घट लक्षात घेऊन नुकसानभरपाई दिली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान,सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रत्यक्ष झालेल्या नुकसानाच्या आधारे न्याय मिळावा आणि विमा कंपन्यांनी जबाबदारीने नुकसानभरपाई द्यावी यासाठी शासनाने ठोस भूमिका घ्यावी अशी मागणी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी सभागृहात केली.

# महापौर कोंडयाल यांच्या हस्ते Tru-Naat मशीन व क्षयरोग तपासणी केंद्राचे उद्घाटन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने मुद्रा नागरी आरोग्य केंद्र येथे क्षयरोग अधिकृत सूक्ष्मदर्शक तपासणी केंद्र व अत्याधुनिक ळ१४–ठ३ मशीनचे उद्घाटन सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंडयाल यांच्या हस्ते संपन्न झाले.

या कार्यक्रमास माजी नगरसेवक राजकुमार हांचटे दत्तात्रय कडगंची, नगरसेविका मीनाक्षी कडगंची, यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच आरोग्याधिकारी डॉ. राखी माने व शहर क्षयरोग अधिकारी डॉ. अरुंधती हराळकर यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात महापौरांच्या हस्ते धन्वंतरी देवाच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर महापौरांच्या हस्ते रिबन कापून Tru-Naat मशीन व क्षयरोग तपासणी केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.यानंतर मान्यवरांचा पुष्पगुच्छ व रोप देऊन सत्कार करण्यात आला. महापौर विनायक कोंडयाल यांचा सत्कार डॉ. प्रसन्नजीत वाघचवरे (वैद्यकीय अधिकारी) यांच्या हस्ते करण्यात आला. नगरसेवक दत्तात्रय कडगंची व मीनाक्षी कडगंची यांचा सत्कार शैलेश सानप (PHN) यांनी केला. तसेच राजकुमार हांचटे यांचा सत्कार विनायक दळवी (TU-3 चे STS) यांनी केला. आरोग्याधिकारी डॉ. राखी माने व शहर क्षयरोग अधिकारी डॉ. अरुंधती हराळकर यांचा सत्कार प्रियांका पवार (PHN) यांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमात मुद्रा नागरी आरोग्य केंद्राच्या २०२५–२६ मधील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आशा सेविकांचा गौरव करण्यात आला. यामध्ये अंबिका देढे, दीपिका रोडे, रजनी कोल्हापूरे व विजया चौगुले यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी महापौर विनायक कोंडयाल यांच्या हस्ते टीबी रुग्णांना आभा कार्ड वाटप करण्यात आले. तसेच प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते टीबी रुग्णांना फूड बास्केट देऊन त्यांना आधार देण्याचा उपक्रम राबविण्यात आला.या कार्यक्रमास मेडिकल ऑफिसर डॉ. प्रसन्नजीत वाघचवरे, टीबी सुपरवायझर विनायक दळवी, प्रमोद मुळीक, टीबी स्टाफ ओंकार गवळी तसेच मुद्रा नागरी आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.